अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– २९/१०/२०२४

**—: प्रेसनोट :—**

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २९/२०२४ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री. महेश पुंडलिक सपकाळे, प्रमुख लिपीक, नेमणुक - महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दुध योजना, वरळी, दुग्धविकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई सध्या नेमणूक - समन्वय अधिकारी, मुंबई उत्तर पूर्व लोकसभा अंतर्गत घाटकोपर (पश्चिम) विधानसभा मतदार संघ १६९ |
| लाचेची मागणी | रू. ५,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रू. ५,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे बृहन्मुंबई महानगर पालिकेमध्ये कनिष्ठ लेखा परीक्षक व लेखा सहायक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी माहे जानेवारी २०२४ ते जून २०२४ या कालावधीत विधानसभा मतदार संघ क्रमांक १६९, घाटकोपर (पश्चिम) येथे एक खिडकी कक्षेत निवडणूकीचे कर्तव्य केले होते. निवडणूक कार्यालयाच्या नियमाप्रमाणे निवडणूक प्रक्रियेमध्ये ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली असते त्यांना निवडणूकीचे कामकाज केल्याबाबत मानधन/ मोबदला म्हणून मुळ वेतनाचे एक बेसिक दिले जाते. त्यानुसार तक्रारदार यांनी दिनांक १९/०९/२०२४ रोजी निवडणूक कार्यालय, १६९ घाटकोपर (प), विधानसभा मतदारसंघ येथे जावून समन्वय अधिकारी श्री.महेश सपकाळे यांच्याकडे चौकशी केली असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामाकरीता रू. ५,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २०/०९/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून लेखी तक्रारअर्ज दिला.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २७/०९/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे रू. ५,०००/- इतक्या रक्कमेची लाच स्वरूपात मागणी करून ती स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक २८/०९/२०२४ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांच्याकडून रू. ५,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री. प्रमोद सुर्वे, पो.नि.  पर्यवेक्षक अधिकारी :- श्रीमती अर्चना सुतार, सहाय्यक पोलीस आयुक्त
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बृहन्मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
**टोलफ्री क्र.** १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :— acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :— acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :— addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :— www.facebook.com - Maharashtra ACB
**मोबाईल ॲप** :— www.acbmaharashtra.net